# बिट्स पिलानी कॅम्पसमध्ये न्युक्लियर मॅग्नेटिक रेझोनन्स कार्यशाळा




**सांकवाळ : बिट्स पिलानी गोवा कॅम्पसमध्ये आयोजित केलेल्या कार्यशाळेत प्रमुख वक्ते व इतर मान्यवरांसमवेत प्रशिक्षणार्थी.**

प्रतिनिधी
वास्को

बिट्स पिलानी के के बिर्ला गोवा कॅम्पसच्या सेंट्रल सोफिस्टिकेटेड इन्स्ट्रुमेंटेशन फॅसिलिटी (सीएसआयएफ)तर्फे न्युक्लियर मॅग्नेटिक रेझोनन्स स्पेक्ट्रोस्कोपीच्या मूलभूत तत्त्वांवर दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत गोवा विद्यापीठ, आयआयटी गोवा, एनआयटी वारंगल व बिट्स पिलानी, डेक्कन केमिकल्स, सिंजेंटा, फायझर व ओटूएच अहमदाबाद येथील सुमारे ८० जणांनी भाग घेतला होता.

ब्रुकर इंडियाचे वरिष्ठ विक्री व्यवस्थापक व ॲप्लिकेशन सायंटिस्ट डॉ. अनिल कुमार व लीड ॲप्लिकेशन ॲण्ड ब्रुक अकादमीचे प्रमुख डॉ. चंद्रशेखर यांनी या कार्यशाळेत सहभागी झालेल्यांना मार्गदर्शन केले. प्रमुख वक्ते लक्ष्यराज खत्री यांनी प्रशिक्षण दिले. डॉ. रवीप्रदास अदुरी यांच्याहस्ते प्रमुख वक्त्यांना स्मृतिचिन्ह प्रदान करण्यात आले तसेच कार्यशाळेत सहभागी झालेल्यांना प्रशस्तीपत्र देण्यात आले.

प्रारंभी, बिट्स पिलानी गोवा कॅम्पसचे संचालक प्रा. सुमन कुंडू यांनी स्वागत केले. डॉ. अनिर्मन रॉय यांनी आभार मानले.